प्रास्ताविक-

मराठी लेखनामध्ये अत्यंत कमी लिहिला गेलेला साहित्यप्रकार म्हणजे स्त्रीयांनी लिहिलेली आत्मचरित्रे. वाचकांना एखाद्या व्यक्तिच्या जीवनातील अंतरंग उलगडण्यास आवडते. त्याच्या निरनिराळ्या छटा, जीवनशैली वाचकांना प्रेरणा देतात. आत्मचरित्रांमधील वर्णनशैली, विविध समस्या, पात्रांची मानसिक स्थिती, भाव भावनांचे केलेले चित्रण आणि न उलगडणाऱ्या स्त्रियांच्या मनाचा वेध यामधून घेता येतो.

१. <u>विषयाचे प्रयोजन व महत्त्व</u>

कलावंत मनाची प्रतिभासंपन्न नवनिर्मिती म्हणजेच कलाकृती. कलावंताच्या जाणीवांचा, त्याच्या परिस्थितीचा त्यांच्या एकंदर मनाचा, अभ्यास करता येतो. त्याचबरोबर त्यांच्या लहानपणातले अनेक अनुभव, घटना, प्रसंग यांचाही वेध घेता येणे शक्य आहे.

स्त्रियांनी प्रामुख्याने स्वत:चे मत मांडण्यास फार विलंब केला आहे. त्यांच्या लिखाणातून दिसणारी भाषिक विविधता, एका सांस्कृतिक सामाजिक गटाचे ती प्रतिनिधित्व करत असते. तिच्या भाषेचे वेगळेपण, आधुनिक कालखंडानुसार बदललेले विचार याचे प्रतिबींब निश्चितच तिच्या लेखनात इथे मुख्यत्वेपणे जाणवेल. त्याच्यासंबंधी अभ्यास करणे.

२. <u>व्याप्ती आणि मर्यादा</u>

मराठीतील काही निवडक स्त्री आत्मचरित्रांचा अभ्यास करणे अपेक्षीत आहे. या अभ्यासाची व्याप्ती निवडक स्त्री आत्मचरित्रांचा आस्वाद घेऊन भाषिक दृष्टीने अभ्यासणे या विषयापुरतीच मर्यादीत आहे.

गृहीतके

संशोधन कार्याला दिशा देण्यासाठी एक प्रकारे संभाव्य परिक्षेत्र ठरवून घेण्यासाठी गृहितकांची मांडणी करणे आवश्यक असते.

मराठी भाषेतील स्त्रियांची लिहिलेल्या आत्मचरित्रांचा विविधरंगी अभ्यास व त्यातून बोध घेणे तसेच खालील गृहितकांतून संशोधन कार्याचा ऊहापोह करणे

- स्त्री आत्मचरित्रांनी स्त्रियांच्या मनाचा वेध घेतला आहे, त्याचा शोध घेणे.
- या आत्मकथनातून सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय भाषिक स्थितीचे स्वरुप समजून घेता येईल.
- या आत्मकथनातून स्त्रियांची भाषाशैली, त्यांचे निवेदन, व्यक्तिरेखा, वातावरण तसेच पर्यावरणानुसार वेगळेपण दिसते.
- स्त्री आत्मकथने पती आत्मचरित्रातून स्थित्यंतरे पावून वास्तवाशी जवळीक साधणारी आहेत.

३. संशोधनामागील उद्दिष्टे

स्त्री आत्मचरित्रांचा अधिक जवळून अभ्यास केल्यास यातून स्त्री प्रवास खऱ्या अर्थाने समजून येतो.

मराठी लेखिकांच्या आत्मचरित्रे आत्मकथन यांना साहित्यात आगळेवेगळे स्थान आहे.

स्त्रियांच्या आत्मचरित्रांतून स्त्री-मनाच्या इतिहासाचा आणि बदललेल्या सामाजिक स्थितीचा प्रवास उलगडत जातो.

अशा लिखाणातून भाषिक वेगळेपणही सामोरे येते. आपली काही भाषिक वैशिष्ट्ये, म्हणी, वाक्प्रचार असे विविधतापूर्ण कल्पक वाक्य सामोरे येतात.

तसेच त्यांच्या निवेदनामुळे अनुभवांशी शब्दसंहितेशी पूर्णत: एकजीव झालेले असते.

निवेदनामुळे कल्पकतेच्या विविध पातळ्यांवरुन अनुभव घेता येतो.

स्त्रीने स्वत:चेच केलेले व्यक्तिचित्रण होय. यामुळे तिच्या मनाचे पापुद्रे उलगडण्यास मदत होते. लेखीकेच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू नव्याने समजल्याने त्यातून आपल्याला प्रेरणा, बोध, मार्गदर्शन आणि कधी कधी आयुष्याला दिशाही मिळते.

स्त्री साहित्यामध्ये विविध पर्यावरणाशी संबंधीत आत्मचरित्रे लिहिली गेली त्यामुळे भाषित वेगळेपण याचा मूळ आधार असणारे आहे.

४. <u>संशोधन पध्दती व तंत्र</u>

सामाजिक भाषा विज्ञान पध्दतीने अभ्यास करता येईल. या पध्दतीने समाजशास्त्रीय दृष्टीकोनही दिसेल. भाषेची व्यक्तीसापेक्ष, समाजसापेक्ष कार्ये, त्यातील अडथळे अडचणी जाणून घेणे. भाषिक समिक्षेतून रसास्वादही घेता येतो.

समाजभाषा विज्ञानात समाजाचे स्वरुप सांगीतले जाते, समाजरचनेत होणारे स्थित्यंतरे सामाजिक संस्था कशा अस्तीत्वात येतात, समाजरचनेतील बदलाची कारणे इ.

भाषा वैज्ञानिक अभ्यासात भाषाभेद का निर्माण होतात. लिंग, जात, वर्ग, संप्रदाय, विचारसरणी, व्यवसाय, पक्ष, प्रदेश स्थित्यंतर चळवळी यांमुळे भाषेत बदल कसे होतात.

स्त्रीवादी दृष्टीकोनातून भाषेचा अभ्यास केल्यास लिंगानुसार भाषा बदललेली दिसते. पुल्लींग/स्त्रीलींग यास परंपरेने वर्चस्वी मानल्यामुळे भाषा बदलली तर सत्ताकेंद्र बदलतील. भाषेच्या अभ्यासातून मनोविज्ञान, मानववंश, विज्ञान, इतिहास, समाजशास्त्र यांना उपयुक्त माहिती मिळते.

भाषिक अभ्यासाच्या निरनिराळ्या अभ्यासपध्दती आहेत. यात सामाजनिष्ठ, ऐतिहासिक, वर्णनात्मक, संकल्पणात्मक, उपयोजित इ.

भाषिक अभ्यास हा साहित्याचा आस्वाद, आकलनास, साह्यभूत ठरणारी, इतर शाखांना आधारभूत ठरणारी व विकासाच्या नव्या दिशा दाखवणारी वैशिष्टयपूर्ण दृष्टी आहे.

५. <u>निष्कर्ष</u>

संशोधनाचा आराखडा

प्रकरण- १ ले

आत्मचरित्र/आत्मकथन संकल्पना स्वरूप आणि व्याप्ती.

प्रस्तुत प्रकरणात आत्मचरित्र/आत्मकथन या संकल्पना स्पष्ट करता येतील. आत्मचरित्र लेखन प्रारंभकाळापासून आजवर त्यात होत गेलेल्या स्थित्यंतराचा वेधही घेतला जाईल. तव्दतच स्त्री आत्मचरित्र एक प्रदीर्घ परिघ अनुभवता येईल.

स्त्री आत्मचरित्र लेखनात स्त्रियांच्या लिखाणामागील प्रेरणा, त्यांच्या प्रवृत्ती, त्यांचे कुटुंबात असणारे स्थान याचा निश्चित रुपाने पडणारा प्रभाव तसेच लिखाणात पती चरित्रामधून होणारी स्थित्यंतरे ही अभ्यासली जाते. पुरुषांची आणि स्त्रियांची आत्मचरित्रे यांचाही अभ्यास केला जाईल.

प्रकरण- २ रे

निवडक स्त्री आत्मचरित्रे/आत्मकथनांचा एकत्रित अभ्यास

प्रस्तुत प्रकरणात स्त्री आत्मकथने एकत्रितरीत्या अभ्यासली जाणार आहेत.

स्त्रियांचे समाजातील स्थान सामाजिक दृष्टीकोन समाजात असणाऱ्या स्थानानुसार स्त्रीचा लिखाणावर पडणारा परिणाम पुरुषाकडून स्त्रीकडे सत्तांतर झाल्यानंतर तिची बदलेली भाषा अनुभवता येईल.

तसेच वेगवेगळया सांस्कृतिक गटातून आलेल्या स्त्रियांचे भिन्न भिन्न स्वरुप तसेच जागतिक गटातील वेगळेपणा याची तुलना करता येईल. साहित्यातून दिसून येणाऱ्या स्त्रीनिष्ठ प्रतिमा त्यांच्या समाजातील स्थान स्त्री जीवनाचे स्वरुप समाज रचनेविषयी निष्कर्ष काढता येईल.

स्त्री ही स्वतंत्र व्यक्ती म्हणून आजच्या समाजात ती वावरत असते. प्रत्येक साहित्य कृतीतून तिचे वेगवेगळे व्यक्तिमत्व प्रतित होते. तिला लाभलेले सभोवतालचे वातावरण आणि त्यानुसार तयार झालेले तिचे व्यक्तिमत्व याचा आधार घेऊन तिचे व्यक्तिचित्रण करायला मदत मिळेल.

साहित्यातू दिसून येणारी सौंदर्यदृष्टी, आत्मविष्कार अनुभवता येतील.

प्रकरण- ३ रे

निवडलेल्या आत्मचरित्रांचा/आत्मकथनांचा भाषिक विचार

- समाजभाषाविज्ञानाचा दृष्टीकोन
- जात/लिंग/संस्कृती/समाज या अंगाने भाषिक विचार
- पर्यावरण विविधतेचा भाषेवरील परिणाम
- भाषिक वैशिष्ट्ये म्हणी/वाक्प्रचार प्रादेशिक वेगळेपण

प्रकरण- ४ थे

स्त्री आणि पुरूष आत्मचरित्रांची भाषा

स्त्रियांच्या भाषेत असणारा साचेबंदपणा, रुढीबध्दता संकेतपालनाला महत्त्व असते. तसेच स्त्रियांची भाषा पुरुषांच्या भाषेच्या तुलनेत अधिक प्रामाण्य राखतांना दिसते. त्यांची भाषा विषयीची जागृकता पुरुषांच्या तुलनेत जास्त आहे का ? याबाबत अभ्यास करता येईल.

प्रकरण- ५ वे

स्त्री आत्मचरित्रांचे/आत्मकथनांचे भाषिक वेगळेपण

स्त्री सुलभ भाव-भावना, त्यांना निसर्गाने लाभलेले देहनिष्ठ, देहधर्म या अनुषंगाने येणारे शब्द कल्पना अभ्यासल्या जाणार आहेत.

श्लील-अश्लिल, कल्पना, रुपके, देहाशी संबंधित म्हणी, वाक्प्रचार, त्यांच्या असणाऱ्या भाषिक अभिव्यक्तींची वैशिष्टये या सर्व बाबी निवडलेले आत्मचरित्र समाज, संस्कृती, जात, प्रदेश इत्यादी संदर्भात वेगळी आहेत. त्या सर्वच संदर्भात वेगळेपणा शोधण्याचा मानस आहे.

प्रकरण- ६ वे

उपसंहार/समारोप/निष्कर्ष

अ)

- वरील प्रकरणांच्या आधारे केलेल्या अभ्यासातून प्रस्तुत प्रकरणात नोंदवले जातील
- प्रस्तुत प्रबंधाच्या सिध्दतेसाठी संश्लेषणात्मक विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब केला जाईल
- प्रबंधात व्यक्त केलेल्या मतांना अनुसरुन पूर्वसूरींच्या मतांची नोंद संदर्भासाठी केली जाईल
- प्रस्तुत प्रबंधाचे लेखन पूर्ण होईपर्यंत त्यात काही अनिवार्य बदल केले जाऊ शकतात.

ब)

१. संदर्भसूची

२. परिशिष्टे/निर्देशसूची

- व्यक्तिनामसूची
- फोटो
- इत्यादी

क) आधारभूत ग्रंथ सूची

अभ्यासार्थ निवडलेली आत्मचरित्रे

१. आहे मनोहर तरी – सुनिताबाई देशपांडे

२. समिधा – साधना आमटे

३. नाच ग घुमा – माधवी देसाई

४. बिनपटाची चौकर – इंदूमती जोंधळे

५. हुमान – संगीता धायगूडे

६. अंत:स्फोट – कुमुद पावडे

७. आयदान – उर्मिला पवार

८. जगायचं प्रत्येक सेकंद – मंगला केवळे

९. तीन दगडांची चूल – विमल मोरे

१०. आदोर – नाजूबाई गावीत

(यापेक्षा अधिक आत्मचरित्रे...)

संदर्भ ग्रंथ सूची

१. आधुनिक भाषाविज्ञान – मिलिंद स. मालशे
(सिध्दांत आणि उपयोजन)

२.	भाषाविज्ञान वर्णनात्मक आणि ऐतिहासिक	-	डॉ. स. ग. मालशे डॉ. हे. वि. इनामदार डॉ. अंजली सोमण
३.	मराठी भाषा उगम व विकास	-	कृ. पां. कुलकर्णी
४.	साहित्य-सिध्दांत	-	डॉ. स. गं. मालशे
५.	चरित्र वाङ्मय, प्रदक्षिणाखंड-।	-	जोशी अ. म.
६.	अस्मितादर्शन दिवाळी अंक (दलित आत्मकथन विशेषांक सन १९८३)	-	चंद्रकुमार नलगे
७.	अस्मितादर्शन दिवाळी अंक (दलित आत्मकथन विशेषांक सन १९८३)	-	जाधव रा. ग.
८.	प्रदक्षिणा खंड दुसरा	-	निर्मलकुमार फडकुले
९.	मराठी लेखिका: चिंता आणि चिंतन	-	भालचंद्र फडके
१०.	आत्मचरित्र मीमांसा	-	आनंद यादव
११.	स्त्रीसाहित्याचा मागोवा भाग १, २, ३	-	मंदा खांडगे लीला दिक्षीत अरुणा ढेरे विनया खडपेकर

१२. डॉ. प्रभा गणोरकर यांचा लेख - स्त्रीवादी समीक्षा व स्त्रीवादी साहित्य

१३. आयदान- सांस्कृतिक ठेवा - डॉ. सिसिलिया कार्व्हालो- सतीश कळसेकर

१४. वाङ्मयप्रकार संकल्पना व स्वरूप - आनंद वास्कर

१५. समाजभाषाविज्ञान - फ्रो. डॉ. प्रभाकर जोशी

१६. सामाजिक भाषाविज्ञान - डॉ. रमेश धोंगडे

१७. भाषिक समाजजीवन - रमेश वरखेडे

१८. द सेकंड सेक्स - सिमोन द बोउआर

१९. स्त्री-पुरुष तुलना - ताराबाई शिंदे

२०. सामाजिक भाषाविज्ञान- कक्षा आणि अभ्यास - डॉ. जयश्री पाटणकर

संशोधक

मार्गदर्शक

(अरुंधती वि. लहाने)

(प्रा.डॉ. कीर्तीकुमार मोरे)
प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
ए.सी.एस. महाविद्यालय,
गंगाखेड, जि. परभणी